# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

जा.क्र.पवैम/उपहारगृह/६३१/२०२६
दिनांक : १९/०५/२०२६

## दरपत्रक सुचना

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी येथे उपहारगृह सुरू करण्यास करार तत्वावर शासकिय, मान्यताप्राप्त व अनुभवी संस्था/एजेन्सी/कंत्राटदारकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | दरपत्रकाचा प्रकार | कोऱ्या दरपत्रकाची किंमत (ना-परतावा) | दरपत्रक स्विकारण्यीच अंतिम दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | उपहारगृह चालविणे | रू. १०००/- | २९/०५/२०२६ | ०२/०६/२०२६ |

ज्यांनी विद्यापीठात/शासकिय कार्यालयात/कंपनीत यापुर्वी उपहारगृह यशस्वीरीत्या चालविलेले आहे अशा अनुभवप्राप्त शासकिय संस्था/एजेन्सी/कंत्राटदारकडून मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रक मागविण्यात येत आहेत. मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रक अर्ज भरून दि २९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी यांचे कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारणे किंवा नाकारणे तसेच दरपत्रकांचे बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा सर्वाधिकार महाविद्यालयाने स्वत:कडे राखुन ठेवलेला आहे.

दरपत्रक प्रपत्र/सुचनापत्र/अटी व शर्तीबाबत माहिती **www.covaspbnmafsu.ac.in** या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक :- २०/०५/२०२६

ठिकाण :- परभणी

सहयोगी अधिष्ठाता 19/5/26
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
परभणी- ४३१४०२(महाराष्ट्र)

**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी**
**उपहारगृह चालवण्याकरीता आवश्यक अटी व शर्ती**

१. उपहारगृहामध्ये पुरविल्या जाणाऱ्या चहा/कॉफी/ दूध व इतर खाद्य पदार्थ इत्यादीचे न्युनतम दर नमूद करणाऱ्या आणि अधिकतम जागेचे भाडे प्रस्तावित करण्या-या अर्जदारास प्राधान्य देण्यात येईल. दरपत्रकाची सुचना तसेच दरपत्रकाचा विहीत नमुना रू. १०००/- इतकी रक्कम भरून रोखपाल यांचेकडे उपलब्ध केली जाईल. तसेच दरपत्रकाचा नमुना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध केला जाईल. परंतु डाउनलोड केलेला दरपत्रकाचा नमुना सादर करतेवेळी रू. १०००/- चा धनाकर्ष सोबत जोडणे अनिवार्य असेल. दरपत्रकासोबत पैसे भरल्याची पावती अथवा धनाकर्ष सादर न केल्यास अर्ज गृहित धरला जाणार नाही.

२. दरपत्रक धारकाकडे अन्न व औषध प्रशासन यांचा वैध परवाना (FSSAI) क्रमांक असणे आवश्यक आहे.

३. अनामत रक्कम रूपये ५०,०००/- तसेच डाउनलोड केलेल्या को-या दरपत्रकाचा रू. १०००/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) "Pay and Accounts Officer, COVAS, Parbhani" या नावे दरपत्रकासोबत बंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे.

४. अंतिम झालेले जागेच्या भाडयाची एकुण ६ महिन्याची आगाऊ रक्कम विजयी झालेल्या उमेदवारास जागेचा ताबा घेण्यापूर्वी जमा (१८% जीएसटी सह) करणे बंधनकारक राहिल. त्यानंतर सहा महिने पूर्ण होण्यापूर्वी पुढील ५ महिन्याची भाडेकराराची रक्कम (१८% जीएसटी सह) जमा करणे बंधनकारक राहिल.

५. ठेकेदारास उपहारगृह बंद करावयचे असल्यास किमान एक महिना आधी महाविद्यालयास लेखी पूर्वसुचना देणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांचेकडून एक महिन्याचे भाडे अनामत रक्कमेतून वजा करून दिली जाईल.

६. उपहारगृह सुरू ठेवण्याची वेळ सकाळी ०७.०० पासून ते रात्री ११.०० वाजे पर्यंत राहिल.

७. उपहारगृह व परीसरात स्वच्छता राखण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील. उपहारगृह परिसरात स्वच्छता न राखल्यास संबंधीत ठेका संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

८. उपहारगृहातील खाद्य पदार्थाची टेबल सेवा देणे व त्याचे पैसे घेणे ही जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहिल महाविद्यालय त्याकरीता जबाबदार राहणार नाही.

९. उपहारगृहात मद्यपान, धुम्रपान करणाऱ्या कामगाराला ठेवता येणार नाही व कोणत्याही अतिथी, विद्यार्थी, कर्मचारी यांनी उपहारगृहात मद्यपान करता येणार नाही यासंबंधीची सर्व काळजी ठेकेदाराने घ्यावयाची आहे तसेच कामगारांचे वैद्यकिय तपासणी नियमित करून प्रमाणपत्र जतन करावे.

१०. तसेच उपहारगृहातील कामगारांनी महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनी / कर्मचारी यांचेशी गैरवर्तन केल्यास संबंधित ठेकेदारास जबाबदार धरून कार्यवाही करण्यात येईल.

११. उपहारगृह चालविणाऱ्या ठेकेदारास स्वत:चे भांडी व उपकरणे उदा. रेफ्रीजरेटर व ओव्हन,गॅस, शेगडी इत्यादी आणावे लागेल.

१२. ठेकेदारास खाद्य पदार्थाचे दरात बदल करावयाचा झाल्यास महाविद्यालयाच्या सल्लागार समितीकडून रितसर मान्येतेच्या अधिन राहूनच नविन दर लागू करण्यात येतील.

१३. ठेकेदारास टेबल व खुर्च्या महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येतील.

१४. ठेकेदारास उपहारगृहातील विद्यूत वापराचे शुल्क प्रतियुनिट १२ रू. प्रमाणे दरमहा अदा करावे लागेल.

१५. ठेकेदारास ११ महिने इतक्या कालावधीचा करारनामा करून दयावा लागेल व तद्नंतर पुढील कालावधीकरिता करार पुनर्जिवीत करणे अथवा नव्याने दरपत्रक मागविणे याबाबतचा हक्क महाविद्यालय प्रशासनाचा राहिल यांची नोंद घ्यावी.

१६. महाविद्यालय प्रशासनास उपरोक्त करारनामा कोणतेही कारण न देता कधीही सपुष्टात आणता येईल व नुकसान झाल्याचे आढळून आल्यास त्याची भरपाई ठेकेदाराकडून करून घेतली जाईल.

१७. ठेकेदाराला संबंधीत करारनामा ५०० रू. चे कोर्ट फी स्टॅम्प वर भरून व नोटरी करून द्यावा लागेल. याबाबतचा सर्व खर्च ठेकेदाराचा राहिल.

१८. अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
१९. उपहारगृहात पुढील प्रकारचे विद्युत उपकरणे जसे - इंडक्शन, हॉट प्लेट, हिटर,इलेक्ट्रीक शेगडी, गीझर, इस्त्री इ. वापरता येणार नाही. तसे आढळून आल्यास त्याबाबत दंडपोटी योग्य ती रक्कम अदा करावी लागेल.
२०. महाविद्यालयाकडून कार्यक्रम वेळी आवश्यकता भासल्यास - चहा, नाश्ताची इ. मागणी केल्यास ठरलेल्या दरात वेळेवर उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या जागेची स्वच्छता करण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदारची राहील.
२१. उपरोक्त अटी /शर्ती संदर्भात कोणतीही अडचण उदभवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार महाविद्यालय प्रशासनास राहील.
२२. करारातील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा हक्क महाविद्यालय प्रशासनास राहिल.
२३. कायदेशीर बाब उद्‌भवल्यास त्याबाबतचा निपटारा परभणी येथील तालुका न्यायालयात केला जाईल.
२४. विद्यापीठ/शासकिय संस्था/महाविद्यालय येथील उपहारगृह चालविण्याचा पुर्वानुभव असलेल्या संस्थेलाच प्राधान्य देण्यात येईल.
२५. विहित मुदती नंतर प्राप्त झालेल्या दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

उपहारगृह चालकांनी सिलबंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक दिनांक २९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी - ४३१ ४०२ या पत्यावर सादर करावेत. सिलबंद लिफाफ्याच्या डाव्या बाजूस पशुवैद्यक व पशुविाान महाविद्यालय येथील **उपहारगृहाचे दर पत्रक** असे नमुद करून दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक नमुद करणे आवश्यक आहे. ज्याचे दरपत्रक स्वीकारले गेले नाही त्यांची अनामत रक्कम रूपये ५०,०००/- (धनाकर्ष) दिनांक ०३/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता समितीमार्फत अदा केली जाईल.

सहयोगी अधिष्ठाता
पशुवैद्यक व पशुविज्ञान
महाविद्यालय, परभणी

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

गोपनिय

## दरपत्रक अर्ज

प्रति,
मा. सहयोगी अधिष्ठाता,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
परभणी

**विषय** :– करार तत्वावर महाविद्यालय परिसरात "उपहारगृह" चालविण्या बाबत निवेदन अर्ज....

**संदर्भ** :– दरपत्रकाची सुचना क्र. पवैम/उपहारगृह/ /२०२६ दि २०/०५/२०२६

महोदय,

मी श्री. ........................................................ दरपत्रक सादरकर्ता, संदर्भीय महाविद्यालय दरपत्रकाची सुचना जाहिरात वाचलेले असून निविदेतील अटी व शर्तीशी, मी पूर्णपणे सहमत आहे. उपहारगृह चालविण्याकरीता तयार असल्याबद्दल हया निविदेव्दारे खालील प्रमाणे माहिती भरून देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपुर्ण नांव | : | |
| २) | फर्म चे नांव व संपुर्ण पत्ता | : | |
| ३) | शासकीय नोंदणी प्रमाणपत्र | : | जाडले आहे /नाही |
| ४) | मुंबई दुकाने व संस्था अधिकनयम १९६१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रक क्रमांक व दिनांक | : | जाडले आहे /नाही |
| ५) | अन्न व औषध प्रशासन यांचा परवाना (FSSAI) क्रमांक | : | जाडले आहे /नाही |
| ६) | व्यवसायकर / सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | : | जाडले आहे /नाही |
| ७) | विद्यापीठ / शासकिय कार्यालय / इतर सार्वजनिक संस्थेत उपहारगृह चालविण्याचा पुर्वानुभव असल्याची कागदपत्रे | : | जाडले आहे /नाही |
| ८) | उपहारगृह भांडे देणेबाबत निविदाधारकाचे पत्र | | जाडले आहे /नाही |
| ९) | अर्जासोबत जोडावयाच्या अनामत रक्कमेची माहिती | | जाडले आहे /नाही |
| १०) | अर्जासोबत जोडावयाचे निविदा शुल्क अदा केल्याबाबतची माहिती | | जाडले आहे /नाही |

ठिकाण :–
दिनांक :–

स्वाक्षरी :–
स्वाक्षरीकत्याचे नांव ..........................
दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र ................
(दरपत्रक कर्त्यांचे नाव / रबरी शिक्का )
(सही व शिक्का)

| अ.क्र. | विवरण | रूपये | शेरा व सही |
|---|---|---|---|
| १ | दरमहा उपहारगृह भाडे (१८% जीएसटी व्यतिरिक्त) | अंकात ........................<br>अक्षरी .......................................... | |
| २ | दरवर्षी करार पुनर्जीवितकरण | मान्य | |
| ३ | इमारत हानी नुकसान भरपाई | मान्य | |

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

## :: दरपत्रक ::

| अ क्र | तपशिल | प्रति नग | दर (रूपये) |
|---|---|---|---|
| १ | चहा | हाफ / फुल | |
| २ | कॉफी | हाफ / फुल | |
| ३ | दुध | हाफ / फुल | |
| ४ | नाश्ता:<br>उपमा : ..............................<br>पोहे : ................................<br>समोसा :..............................<br>ब्रेड पकोडा : ......................<br>वडा : ................................<br>भजी : ...............................<br>आलू पराठा : ...................... | प्रति प्लेट/प्रति नग | उपमा : ............................<br>पोहे : ..............................<br>समोसा :............................<br>ब्रेड पकोडा : ...................<br>वडा : .............................<br>भजी : ............................<br>आलू पराठा : .................. |
| ५ | ब्रेड आम्लेट – ०२ अंडा/ब्रेड बटर | प्रति प्लेट | |
| ६ | दोसा, इडली, उत्तपा | प्रति प्लेट | |
| ७ | जेवण (लिमिटेड) वेज (२ भाजी, पोळया ४ भात एक प्लेट, वरण, लोणचे/पापड/चटणी इ.) | प्रति प्लेट | |
| ८ | जेवण (अनलिमिटेड) वेज (३ भाजी, पोळया ६, भात एक प्लेट, वरण, लोणचे, पापड, दही, सलाद, गोड पदार्थ इ.) | प्रति प्लेट | |
| ९ | जेवण (अनलिमिटेड) नॉनवेज मटन/चिकन भाजी, पोळया ६, भात एक प्लेट, सलाद | प्रति प्लेट | |
| १० | मसिक सदस्यांसाठी (दोन वेळ) जेवणाचे दर | मासिक | |
| ११ | थंड पेय | प्रति नग | |

नोट :– पॉकेट बंद खाद्यपदार्थ दर पॉकेटवर नमुद दिल्यानुसार राहतील.

ठिकाण :–

दिनांक :–

स्वाक्षरी ....................

स्वाक्षरीकर्त्याचे नांव ..............................

दूरध्वनी क्र/भ्रमणध्वनी क्र. ....................

(दरपत्रक कर्त्यांचे नाव / रबरी शिक्का)